**मृद व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखालील असलेल्या जलस्त्रोतांची विशेष दुरुस्ती करुन सिंचन क्षमता पुनर्स्थापना (Restoration) करण्याकरिता "मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना" ( CMJSY) हा कार्यक्रम राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: मुजयो २०२०/प्र.क्र.७६ /जल-१**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
**दिनांक: १७ फेब्रुवारी, २०२१**

**वाचा:**

१. शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग क्र.कोपबं -२०१८/प्र.क्र.१८३/ जल-०१, दि.२०/७/२०१८.
२. शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग क्र.लपायो -२०१८/प्र.क्र.१७७/ जल-०१, दि.२०/७/२०१८.
३. शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.लपायो१०९९/प्र.क्र.३४७/जल-१ दि.३१/७/२०००
४. दि.०४/०२/२०२१ रोजीच्या मा.मंत्रीमंडळ बैठकीचे इतिवृत्त दि.११/०२/२०२१

**प्रस्तावना**

सिंचनातून समृध्दी साधण्यासाठी सिंचन प्रकल्प कार्यक्षम पध्दतीने कार्यरत राहणे आवश्यक आहे. जलसंधारण यंत्रणेमार्फत विकेंद्रित व सर्वदूर भागात संपूर्ण राज्यात पाणीसाठे निर्माण केलेले आहेत. या योजनांचा मोठ्या प्रमाणावर फायदा शेती करिता संरक्षित सिंचन व पाणीपुरवठा योजनांना झालेला आहे.

मागील ३५ ते ४० वर्षात दुष्काळ निवारणार्थ रोजगार हमी योजना व इतर योजनेंच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर जलस्त्रोतांची निर्मिती करण्यात आलेली आहे. या जलस्त्रोतांची नियमित देखभाल व दुरुस्ती न झाल्यामुळे त्यांचा पूर्ण कार्यक्षमतेने वापर करण्यात येत नाही अशा पूर्ण झालेल्या योजनांपैकी सुमारे ७९१६ योजनांची विशेष दुरुस्ती करुन जलसाठा व सिंचन क्षमता पुनर्स्थापित करणे आवश्यक आहे. अशा योजनांचे पुनरुज्जीवन केल्यास पुर्ण क्षमतने जलसाठा व सिंचन क्षमता पुनर्स्थापित होवून शेतक-यांना संरक्षित सिंचनाकरिता पाणी उपलब्ध होईल. सबब मृद व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखालील असलेल्या जलस्त्रोतांची विशेष दुरुस्ती करुन सिंचन क्षमता पुनर्स्थापित (Restoration) करण्याकरिता "मुख्यमंत्री जलसंवर्धन कार्यक्रम" राबविण्याची बाब मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीत विषय क्र.३ वर निर्णयार्थ सादर करण्यात आली होती. बैठकीमध्ये या योजनेबाबत खालील प्रमाणे निर्णय होऊन काही सुधारणांसह योजनेस मान्यता देण्यात आली.

१) विशेष दुरुस्ती करावयाच्या कामापैकी नादुरुस्त कालव्यावर नलिका वितरण प्रणाली (PDN ) या कामाचा समावेश करु नये.
२) ज्या दुरुस्तीमुळे कोणतीही सिंचन क्षमता पुनर्स्थापित होणार नसेल असे काम या योजनेअंतर्गत विशेष दुरुस्तीसाठी हाती घेण्यात येवू नये.

वरील मान्यतेस अनुसरुन शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

## २. शासन निर्णय :-

राज्यातील पूर्ण झालेल्या जलसंधारण योजनांपैकी देखभाल व दुरुस्ती आवश्यक असलेल्या योजनांचे परिरक्षण व दुरुस्ती करुन सिंचन क्षमता पुर्नस्थापित करण्याच्या अनुषंगाने **"मुख्यमंत्री जलसंवर्धन कार्यक्रम"** ( CMJSY) राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

## ३. कार्यक्रमाचा उद्देश: -

मृद व जलसंधारण विभागांतर्गत धोकादायक असणाऱ्या जलस्त्रोतांची/बांधकाम उपचारांची विशेष दुरुस्ती करुन पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करणे, सिंचन क्षमता पुनर्स्थापित करणे व संरक्षित सिंचनाची सोय करणे. तसेच विशेष दुरूस्तीनंतर पाणी वापर संस्था स्थापन करून त्यांच्याकडे देखभाल दुरुस्तीसाठी हस्तांतरीत करणे.

## ४. उद्दिष्ट व कालावधी :

या कार्यक्रमांतर्गत सुमारे ७,९१६ योजनांची विशेष दुरुस्ती करण्यात येणार असून सदर कार्यक्रम एप्रिल,२०२० ते मार्च,२०२३ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. एकूण दुरूस्तीच्या कार्यक्रमास रु. १३४०.७५ कोटी निधी आवश्यक आहे.

## ५. योजनेतंर्गत करण्यात येणारी कामे :

५.१ या योजनेंतर्गत मृद व जलसंधारण विभागाच्या व इतर विभागाच्या अखत्यारीतील ० ते ६०० हेक्टर सिंचन क्षमतेचे लघुसिंचन तलाव, साठवण तलाव, माजी मालगुजारी तलाव, गाव तलाव, पाझर तलाव, माती नालाबांध, सिमेंट नालाबांध, साठवण बंधारे, कोल्हापुर पध्दतीचे बंधारे, वळवणीचे बंधारे, इत्यादी प्रकल्पांची विशेष दुरूस्तीची कामे करण्यात येऊन सिंचन क्षमता पुनर्स्थापित करण्यात येणार आहे.

### ५.२ पाणी वापर संस्था स्थापन करणे व नियमित देखभाल करणे :-

शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग क्र.कोपबं -२०१८/प्र.क्र.१८३/ जल-०१, दि.२०/७/२०१८. व शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग क्र.लपायो -२०१८/ प्र.क्र.१७७/ जल-०१, दि.२०/७/२०१८ मधील तरतुदीनुसार पाणी वापर संस्था स्थापन करण्यात येणार आहेत. नियोजन विभागाने सुचविल्यानुसार दुरुस्तीचे काम अंतिम करण्यापूर्वी पाणीवापर संस्था स्थापन करण्याबाबत जिल्हा जलसंधारण अधिकारी व प्रादेशिक जलसंधारण अधिकारी यांनी हमी/प्रमाणपत्र अपर आयुक्त तथा मुख्य अभियंता मृद व जलसंधारण विभाग यांना सादर करतील.

५.३ विशेष दुरुस्ती करावयाच्या कामापैकी नादुरुस्त कालव्यावर नलिका वितरण प्रणाली (PDN ) या कामाचा समावेश करु नये.

५.४ ज्या दुरुस्तीमुळे कोणतीही सिंचन क्षमता पुनर्स्थापित होणार नसेल असे काम या योजनेअंतर्गत विशेष दुरुस्तीसाठी हाती घेण्यात येवू नये.

**६ निधीची उपलब्धता :**

६.१ या योजने/कार्यक्रमाच्या अंतर्गत करण्यात येणाऱ्या कामाप्रित्यर्थ खर्चास प्रचलित लेखाशिर्षाखाली प्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

मृद व जलसंधारण विभागाच्या राज्य योजना अंतर्गत मागणी क्रमांक ZH ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमता परिरक्षण व दुरुस्ती (४७०२ ए ०४६) , १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमता परिरक्षण व दुरुस्ती (४७०२ ए ०५५) व २५१ ते ६०० हेक्टर सिंचन क्षमता परिरक्षण व दुरुस्ती ( ४७०२ ए ०६४) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होणारा निधी.

६.२ जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मृद व जलसंधारण योजनांच्या दुरुस्तीकरिता उपलब्ध होणारा निधी.

६.३ उपरोक्त प्रमाणे शासन स्तर व जिल्हा नियोजन समिती यांच्या मार्फत प्राप्त होणारा निधी यामधून मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेंतर्गत आराखड्यानुसार दुरुस्तीची कामे करण्यात येणार आहेत. योजनेची द्विरुक्ती होणार नाही याची दक्षता जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी घेण्यात यावी व द्विरुक्तीस जिल्हा जलसंधारण अधिकारी जबाबदार राहतील.

**७ निकष :**

संदर्भिय शासन निर्णय क्र. १ व २ मध्ये विशेष दुरुस्तीचे स्वरुप व निकष निश्चित करण्यात आलेले आहेत त्यामधील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

**८ अंमलबजावणी करणारी यंत्रणा :-**

जलसंपदा विभाग, पाणी पुरवठा विभाग,कृषी विभाग व सर्व जिल्हा परिषदा यांच्या अखत्यारीतील ० ते ६०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या मर्यादेतील.सर्व प्रकल्पांची दुरुस्ती जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग (राज्यस्तर ) यांच्या मार्फत पूर्ण करण्यात येणार आहे.या विशेष दुरुस्तीसाठी संबधित यंत्रणाच्या नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

**९ कार्यक्रम आराखडा :**

९.१ जिल्हयातील दुरूस्ती आवश्यक असलेल्या सर्व दुरूस्ती कामांची एकत्रित यादी जिल्हा स्तरावर करण्यात यावी. जिल्हयातील सर्व यंत्रणांनी दुरुस्तीच्या कामाची यादी जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग (राज्यस्तर ) यांना सादर करावयाची आहे. योजनेंतर्गत मंडळनिहाय तपशिल स्वतंत्र तक्त्यात सादर करण्यात यावा.

९.२ या यादीमध्ये निरीक्षणानुसार धोकादायक/विशेषदुरुस्ती आवश्यक असलेल्या कामांचा प्राधान्यक्रम (१,२व३) निश्चित करण्यात यावा. प्राधान्यक्रम १ मध्ये अति धोकादायक,प्राधान्यक्रम २ मध्ये विशेष दुरूस्ती व प्राधान्यक्रम ३ मध्ये सर्वसाधारण दुरूस्ती घेण्यात यावी.

९.३ प्रस्तावित योजनेत दुरुस्तीसाठी समाविष्ट असलेल्या कामांस जिल्हा नियोजन समितीकडून निधी प्राप्त झाल्यास योजनेतून सदर काम वगळण्यात यावे.कोणत्याही

दुरुस्तीच्या कामाची द्विरुक्ती होणार नाही याची दक्षता जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी घ्यावी व द्विरुक्तीस जिल्हा जलसंधारण अधिकारी जबाबदार राहतील.

**१० प्रशासकीय मान्यता :**

**१०.१** जिल्हास्तरीय योजना अंतर्गत प्रस्तावित दुरूस्ती कामांना प्रशासकीय मान्यता प्रस्ताव (सर्वसाधारण)शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग क्र.कोपबं -२०१८/प्र.क्र.१८३/ जल-०१, दि.२०/७/२०१८. व शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग क्र.लपायो -२०१८/प्र.क्र.१७७/ जल-०१, दि.२०/७/२०१८ मधील मार्गदर्शक सुचनानुसार तयार करण्यात यावे.

१०.२ राज्य योजना अंतर्गत दुरुस्ती प्रस्तावित कामांना (राज्यस्तर, जिल्हा परिषद व संचालक मृदसंधारण यांच्या अंतर्गत असणारी जलसंधारणाची कामे) प्रशासकीय मान्यतेकरिता सक्षम अधिका-याच्या (प्रादेशिक जलसंधारण अधिकारी/विभागीय कृषी संचालक) तांत्रिक मान्यतेसह प्रादेशिक जलसंधारण अधिकारी कार्यालयात सविस्तर तपासणी करून “प्रपत्र अ” मध्ये प्रस्ताव अप्पर आयुक्त, जलसंधारण तथा मुख्य अभियंता / संचालक मृदसंधारण यांनी प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करावयाचा आहे. रु. ५० लक्ष पेक्षा कमी रक्कमेची दुरुस्ती अंदाजपत्रके प्रस्तावा सोबत पाठविण्याची आवश्यकता नाही तथापि दुरुस्ती अंदाजपत्रकाची रक्कम ५० लक्ष पेक्षा अधिक असल्यास ती अंदाजपत्रके प्रस्तावासह शासनास प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात यावी. प्राप्त प्रस्तांवाना निधी उपलब्धतेनुसार राज्यस्तर योजने अंतर्गत शासन स्तरावर प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

१०.३ मृद संधारण विभागाच्या विशेष दुरुस्तीच्या कामाच्या अंदाजपत्रकास सक्षम स्तरावरुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येईल.

**१०.४** प्रशासकीय मान्यता प्रस्तावात कार्यव्ययी आस्थापना खर्चाचा समावेश असणार नाही.

**११.तांत्रिक मान्यता:-**

अ) जलसंधारण विभागाच्या दुरुस्तीच्या कामांची अंदाजपत्रके संदर्भिय शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग क्र.कोपबं -२०१८/प्र.क्र.१८३/ जल-०१, दि.२०/७/२०१८ व शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग क्र.लपायो -२०१८/प्र.क्र.१७७/ जल-०१, दि.२०/७/२०१८ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार तयार करण्यात यावीत व सदर दुरूस्ती अंदाजपत्रकास सक्षम स्तरावरुन प्रचलित नियमानुसार तांत्रीक मान्यता प्रदान करण्यात यावी.

ब) मृद संधारण विभागाच्या विशेष दुरुस्तीच्या कामाच्या अंदाजपत्रकास सक्षम स्तरावरून प्रचलित नियमानुसार तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात यावी.

**१२. गुणवत्ता व सनियंत्रण:**

१२.१ दुरुस्तीच्या कामाकरिता शासन निर्णय क्रमांक लपायो-२०१८/ प्र.क्र. १७७/जल-१, दि. २०/७/२०१८ व क्र.कोपबं -२०१८/प्र.क्र.१८३/ जल-०१, दि.२०/७/२०१८ शासन निर्णयामधील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१२.२ अंदाजपत्रकामध्ये गुणनियंत्रणाच्या चाचण्यांच्या दृष्टीने व अनुषंगिक खर्चासाठी दुरुस्तीच्या कामाच्या किमतीच्या २ टक्के तरतुद करण्यात यावी. (अनुषंगिक बाबीमध्ये स्टेशनरी, छायाचित्रण करणे व जतन करणे, पर्यवेक्षिय व्यवस्था, संगणकीय व्यवस्था, वाहन व्यवस्था, तांत्रिक मनुष्यबळ, त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासणी, व इतर कामे.)

**१२.३ व्हिडीओ चित्रीकरण :**

दुरूस्ती कामांच्या प्रत्येक टप्प्याचे जिओटॅग (Geotag) व वेळेसह व्हिडीओ चित्रीकरण बंधनकारक आहे.

**१२.३.१** (१) काम सुरू करण्यापूर्वी, (२) २५ % काम पूर्ण झाल्यानंतर, (३) ५० % काम पूर्ण झाल्यानंतर, (४) ७५ % काम पूर्ण झाल्यानंतर, (५) १०० % काम पूर्ण झाल्यानंतर या किमान ५ टप्प्यात जिओटॅग (Geotag) व्हिडीओ चित्रीकरण करण्यात यावे. प्रत्येक टप्प्याच्या व्हिडीओ चित्रीकरणाचा कालावधी किमान ३ मिनिटांचा आवश्यक राहील. व्हिडीओ चित्रीकरण करताना खालील महत्त्वाच्या बाबींचे चित्रीकरण करण्यात यावे.

**१२.३.२** काम सुरू करण्यापूर्वी तलावाच्या भिंतीचे सांध्यापासून ते दुसऱ्या टोकापर्यंत पूर्ण चित्रीकरण करण्यात यावे. तसेच के.टी.वेअर/सिमेंट बंधारे यांचेही एका बाजूने चित्रीकरणास सुरुवात करून दुसऱ्या टोकापर्यंत संपूर्ण चित्रीकरण करण्यात यावे.

१२.३.३ व्हीडीओ चित्रीकरण करतांना **प्रत्येक वेळेला** कामाचे शाखा अभियंता व कंत्राटदार किंवा त्यांनी प्रशिक्षित केलेला तांत्रिक कर्मचारी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तसेच कंत्राटदार यांनी सुध्दा व्हीडीओ चित्रीकरण करतांना किमान २ वेळेस उपस्थित राहणे अनिवार्य राहील. तसेच ते चित्रिकरणामध्ये स्पष्टपणे दिसतील याची दक्षता घेण्यात यावी.

१२.३.४ कामाच्या चित्रिकरणामध्ये ५ टप्यांपैकी किमान २ टप्प्यामध्ये उपविभागीय जलसंधारण अधिकारी व एका टप्यामध्ये जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तसेच ते चित्रिकरणामध्ये स्पष्टपणे दिसतील याची दक्षता घेण्यात यावी.

१२.३.५ चित्रीकरणाची एक प्रत उपविभागीय जलसंधारण अधिकारी स्तरावर मोजमाप पुस्तिकेसह जतन करण्यात यावी.

१२.३.६ देयके पारित करताना मोजमाप पुस्तिकेसोबत चित्रीकरणाची सी.डी. किंवा पेन ड्राईव्ह जोडण्यात यावा.तसेच मोजमाप पुस्तिकेमध्ये याबाबत स्पष्टपणे नमूद करण्यात यावे.

१२.३.७ व्हिडीओ चित्रिकरणाची दुसरी प्रत जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी देयक पारित करतांना तपासायची आहे व वरील सूचना प्रमाणे चित्रिकरण नसल्यास देयक पारित करण्यात येऊ नये.

१२.३.८ चित्रिकरणाची किमान १५ सेकंदाची संक्षिप्त प्रत विभागाच्या जीओपोर्टलवर (Geoportal) वर अपलोड करण्यात यावी.

**१३.** सदर कामांची गुणवत्ता उच्चतम दर्जाची राहील याची जबाबदारी जलसंधारण अधिकारी/ उपविभागीय जलसंधारण अधिकारी/जिल्हा जलसंधारण अधिकारी यांची राहील.

१४. **वरीष्ठ पर्यवेक्षीय अधिकारी यांनी कामास भेट देणे:**

दुरुस्तीचे काम सुरु असतांना दुरुस्तीच्या कामात प्रस्तावित करण्यात आलेल्या घटकांची तांत्रिकदृष्टया तपासणी इतर विभागाच्या अखत्यारीतील उपविभागीय जलसंधारण अधिकाऱ्यांनी करावयाची आहे. सदर तपासणी अधिकाऱ्याची नियुक्ती प्रादेशिक जलसंधारण अधिकारी यांनी करावयाची आहे. तपासणी करतांना गुणनियंत्रणाच्या चाचण्या विहीत मापदंडानुसार असल्याची खात्री करण्यात यावी. काम सुरु असतांना, काम ५० टक्के पूर्ण झाल्यावर व संपूर्ण काम पूर्ण झाल्यावर भेट द्यावयाची आहे.

१४.१ **मृद व जलसंधारण विभागाच्या दक्षता व गुणनियंत्रण पथकामार्फत प्रगतीपथावरील**/पूर्ण झालेल्या दुरुस्तीकामाची वेळोवेळी तपासणी करण्यात यावी.

१४.२ राज्यस्तरावर व आयुक्त स्तरावर प्रकल्प कार्यान्वयन कक्षाची स्थापना करुन सदर कक्षामार्फत प्रकल्पाचे संनियंत्रण करण्यात यावे . मुख्य अभियंता तथा सह सचिव हे प्रकल्प कार्यान्वयन कक्षाचे प्रमुख राहतील या करिता मनुष्यबळ बाह्यस्थ संस्थेमार्फत घेण्यात यावे.

१४.३ या कार्यक्रमांतर्गत कामाचा मासिक प्रगती अहवाल प्रादेशिक जलसंधारण अधिकारी यांनी सादर करावा.

१४.४ या कार्यक्रमांतर्गत सर्व कामे वेळेवर पूर्ण करणाऱ्या अभियंत्यास प्रोत्साहन देणे, विभागीय पातळीवर कार्यशाळा घेणे, यशोगाथा तयार करणे इ.बाबींचा समावेश आहे.

१४.५ दुरुस्तीच्या कामाचा दोष देय कालावधी (Defect Liability Period )हा ५ वर्ष राहिल.

**१५ मूल्यमापन**

काम पुर्ण झाल्यानंतर त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन करण्यात यावे. मुल्यमापनाकरीता नियोजन विभागामार्फत निवडण्यात आलेल्या संस्थांमधून जिल्हानिहाय मुल्यमापन संस्थांची निवड आयुक्त स्तरावरून करण्यात यावी. मुल्यमापनामध्ये एकवाक्यता राहण्यासाठी शासन स्तरावरून निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचा वापर करुन सर्व समावेशक मार्गदर्शक सूचना / मुल्यमापनाकरीता विहीत नमूना आयुक्त, मृद व जलसंधारण यांचेस्तरावरुन शासन मान्यतेने निर्गमित करण्यात यावा.

१६ सर्व साधारण सुचना :-

१६.१ मृदसंधारण विभागांतर्गत येणाऱ्या सिमेंट बांध व मातीनाला बांध यांच्या दुरुस्तीच्या कामासाठी संचालक, पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे यांनी स्वतंत्र मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात याव्यात.

१६.२ धोकादायक स्थितीतील योजनांची/प्रकल्पाची तपासणी धरण सुरक्षितता संघटना, नाशिक यांचेकडून (त्याचे तपासणी निकषात बसणाऱ्या) ही दुरुस्तीपूर्वी करुन घेण्यात यावी.तथापि, त्यांच्या निकषात न बसणाऱ्या धरणांची तपासणी संबधित प्रादेशिक जलसंधारण अधिकारी यांनी करावयाची आहे.

१६.३ केलेल्या कामाचा सर्व तपशिल ग्रामसभे समोर ठेवण्यात यावा.

१६.४ पाणी वापर संस्था स्थापन करण्यासाठी ठेकेदारास निविदेत अटी घालून बंधनकारक करण्यात यावे. WUA स्थापन होईपर्यंत निविदेच्या १०% रक्कम ठेकेदाराच्या देयकातून कपात करण्यात यावी.संस्था स्थापन झाल्यानंतर सदरची रक्कम वितरित करण्यात यावी.अपवादात्मक परिस्थितीत संस्था स्थापित होऊ शकत नसल्यास सविस्तर कारणमीमांसेसह प्रस्ताव शासनास सादर करून शासनाच्या मान्यते नंतर कपात केलेला १०% निधी वितरित करण्यात यावा.पाणी वापर संस्था स्थापन केल्याबद्दल ठेकेदारास मृद व जलसंधारण विभाग शा.नि.क्र:लपायो-२०१८/प्र.क्र.१७७/जल-१ दि.२०.०७.२०१८ मधील भाग C नुसार मानधन देण्यात यावे.

१७ प्रस्तुत आदेश, प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

"**मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना**"( CMJSY) या कार्यक्रमाच्या प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास नियोजन विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र.८७/१४३४/ दिनांक ०४.०१.२०२१ अन्वये व वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र. २५/२१/व्यय-१५/ दिनांक २७.०१.२०२१ अन्वये सहमती दर्शविली आहे.

सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन, त्याचा सांकेतांक क्रमांक २०२१०२१७१७३३५७४१२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NANDKUMAR VERMA

Digitally signed by NANDKUMAR VERMA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOIL AND WATER CONSERVATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c98b875883e76c14d91ed7b89546e6c11e439cad32d7f5cff487862cc567ee39, pseudonym=8DD51EE304775C22C23852DC8597F84B9FEF8A01, serialNumber=DCD3577EBF0E05E2A8B57095C152DC6CFB37C2BB83DA197788645DD8A362EBC5, cn=NANDKUMAR VERMA
Date: 2021.02.17 17:40:09 +05'30'

**( नंद कुमार )**

**अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मंबई.

२) मा. मुख्यमंत्री, यांचे अप्पर मुख्य सचिव.

३) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधान सभा, विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई

४) सर्व मा. संसद सदस्य, विधान मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.

५) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खासगी सचिव.

६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

७) सर्व मंत्रालयीन विभागांचे अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव.

८) मा.मंत्री ( मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.

९) मा. राज्य मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.

१०) महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षण ), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

११) प्रधान सचिव ( मृद व जलसंधारण) यांचे स्वीय सहाय्यक.

१२) आयुक्त, मृद व जलसंधारण ,जल आयुक्तालय, औरंगाबाद

१३) जिल्हाधिकारी, सर्व.

१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,सर्व.

१५) जिल्हाधिकारी, सर्व.

१६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद.

१७) अप्पर आयुक्त तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, पुणे/नागपूर.

१८) मुख्य अभियंता तथा सह सचिव, मृद वजलसंधारण, मंत्रालय, मुंबई.

१९) संचालक, पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे.

२०) प्रादेशिक जलसंधारण अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, मृद व जलसंधारण विभाग सर्व.

२१) प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण पथक सर्व

२२) जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा कार्यकारी अभियंता जलसंधारण, मृद व जलसंधारण विभाग, सर्व

२३) जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (ल.पा), मृद व जलसंधारण विभाग, जिल्हा परिषद,सर्व

२४) अवर सचिव जल-४/जल-७, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

२५) जल -१/३ संग्रहार्थ.